| MHYA110011592025 | खटला दाखल दिनांक | १५.०४.२०२५ |
|---|---|---|
| | खटला नोंदणी दिनांक | १५.०४.२०२५ |
| | खटला निकाल दिनांक | ०६.०६.२०२६ |
| | कालावधी | ०१ वर्ष ०१ महिने २१ दिवस |

**नियमित फौजदारी खटला क्र. २३९/२०२५**
**सीएनआर क्र.एमएचवायए११-००११५९-२०२५**

**निशाणी क्र. ३२**

फॉर्म क्र. ३२

**भाग अ**

(फौजदारी नियमावली चे प्रकरण ६ मधील परिच्छेद ४४(१) प्रमाणे)

| न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग उमरखेड यांचे न्यायालयात<br>**पिठासीन अधिकारी - श्रीमती जयक्रांती एच. पांचाळ, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उमरखेड.**<br>(०६.०६.२०२६)<br>(नियमित फौजदारी खटला क्र. २३९/२०२५) | |
|---|---|
| (प्रथम खबरी अहवाल क्र. ३९९/२०२४, कलम ३५४,४५२, ३२३, ५०४, सहकलम ३४ भा. दं.वि. अन्वये, पोलीस ठाणे उमरखेड) | |
| फिर्यादी | **महाराष्ट्र शासन, मार्फत पोलीस निरीक्षक, उमरखेड** |
| अभियोग पक्षा तर्फे | अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी वकील श्री. व्ही.बी.गोरे |
| आरोपी | १. रितेश महेंद्र तिवारी<br>वय २२, वर्ष धंदा मजुरी,<br>२. रोहीत सतीष शहाणे<br>वय २४, वर्ष धंदा मजुरी,<br>३. मयुर गोविंद डोम<br>वय २७, वर्ष धंदा मजुरी,<br>सर्व रा. विडूळ ता. उमरखेड जि. यवतमाळ. |
| आरोपींचे विधीज्ञ | श्री. व्ही.के.गाजेवार |

**भाग - ब**

(फौजदारी नियमावली चे प्रकरण ६ मधील परिच्छेद ४४(२) प्रमाणे)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०१.०६.२०२४ |
| गुन्हा दाखल दिनांक | ०२.०६.२०२४ |
| अंतिम अहवाल दाखल दिनांक | १५.०४.२०२५ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | २४.०३.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०४.०६.२०२६ |
| निकालाकरिता ठेवल्याचा दिनांक | ०६.०६.२०२६ |

| | |
|---|---|
| निकालाचा दिनांक | ०६.०६.२०२६ |
| शिक्षेचा दिनांक, असल्यास | -- |

**आरोपीचा तपशील**

| आरोपी क्र | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामिन दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावल | कलम ४२८ फौजदारी प्रक्रिया संहितेच्या उद्देशाने खटल्याच्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रितेश महेंद्र तिवारी | सुचनापत्र | -- | ३५४,४५२, ३२३, ५०४, सहकलम ३४ भा. द.वि. | निर्दोष | – | - |
| २. | रोहीत सतीष शहाणे | सुचनापत्र | -- | ३५४अ,३२३ ,५०४,५०६ सहकलम ३४ भा.दं.वि. | निर्दोष | – | - |
| ३. | मयुर गोविंद डोम | सुचनापत्र | -- | ३५४अ,३२३ ,५०४,५०६ सहकलम ३४ भा.दं.वि. | निर्दोष | – | - |

**भाग क Part 'C'**

(फौजदारी नियमावली चे प्रकरण ६ मधील परिच्देद क्र. ४४(३) प्रमाणे)

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/ न्यायालय साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्ष-**

| सा. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप (नेत्र साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| १ | पिडीता | फिर्यादी |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास-**

| सा. | नाव | पुराव्याचे स्वरूप (नेत्र साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| क्र. | | साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
| - | – | -- |

**क. न्यायालयाचे साक्षीदार, असल्यास-**

| सा. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप (नेत्र साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| - | – | -- |

**अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ न्यायालयाच्या निशाणी क्रमांकाची यादी**

**अ. अभियोगपक्ष -**

| अनु. क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | २७/सा.क्रं.१ | फिर्यादवरील सही |
| २ | २८/सा.क्रं.१ | प्रथम खबर अहवाला वरील सही |

**ब. बचावपक्ष -**

| अनु. क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| - | – | -- |

**क. न्यायालयाने दिलेले निशाणी क्रमांक -**

| अनु. क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | --- | --- |
| २ | --- | --- |

**ड. भौतिक वस्तु -**

| अनु. क्र. | भौतिक वस्तुचा क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| - | - | -- |

## <u>न्यायनिर्णय</u>

**(घोषित दिनांकः ०६.०६.२०२६)**

आरोपी, भारतीय दंड विधान कलम ३५४, ४५२, ३२३, ५०४ सहकलम ३४ भा. द.वि. अन्वयेच्या अपराधासाठी चालविण्यात येणा-या खटल्यास सामोरे जात आहे. (प्रस्तूत प्रकरण हे विनयभंगाचे असल्यामूळे फिर्यादीच्या व तिच्या सासुचा नावाचा व ओळखीचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रित्या कूठेही सदर न्यायनिर्णयात नामोल्लेख करण्यात आलेला नाही)

**<u>अभियोग पक्षाची हकीकत सारांशरुपाने खालीलप्रमाणेः</u>**

**०२.** फिर्यादीः पिडीता रा. विडूळ ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी दिनांक ०२.०६.२०२४ रोजी पोलीस स्टेशन, उमरखेड येथे फिर्याद दिली की, दिनांक ०१.०६.२०२४ रोजी सायंकाळी ०६.०० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी घरी असतांना आरोपी रितेश तिवारी रा. विडूळ हा फिर्यादीचे घरापुढे येवून तिचा पती घरी आहे काय याची विचारपुस करीत होता. फिर्यादीने माझे पती कामावरून घरी आले नाही असे सांगितल्याने आरोपी रितेश तिवारी तेथून निघून गेला. त्याच दिवशी रात्री ०७.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी तिच्या पती व सासू सह घरामध्ये जेवण करीत असतांना सर्व आरोपी यांनी घरात प्रवेश करून 'तु पोलिसांना माझयाबददल माहिती का दिली' असे का विचारले या कारणावरून वाद करून शिवीगाळ केली व फिर्यादीचा पती याला कॉलर पकडून घराचे बाहेर ओढत नेले. फिर्यादीने व तिच्या सासूने सोडविण्याचा प्रयत्न केला असता, आरोपी रितेश तिवारी याने हिना परवीन हिची ओढणी ओढली व बाजूला फेकुन दिली व तिचे केस ओढून फिर्यादीचा विनयभंग केला. सत्तारची आई मध्ये आली असता, आरोपी रितेश तिवारीने तिचा कुर्ता ओढून फाडला. रितेश तिवारीसोबत असणारे इतर आरोपी तिथून निघून गेले.

**०३.** सदर जवाबवरुन आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, उमरखेड येथे गुन्हा नोंद क्र. ३९९/२०२४ नुसार भारतीय दंड विधान कलम ३५४, ४५२, ३२३, ५०४ सहकलम ३४ प्रमाणेच्या अपराधाकरिता गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास तपासीक अधिकारी श्री. निलेश शंकर सरदार, ए.पी.आय. पो.स्टे. उमरखेड यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले, घटनास्थळाला भेट देऊन घटनास्थळ पंचनामा तयार केला, आरोपीस सुचनापत्र दिले व तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्यामुळे त्यांच्याविरुध्द भा.दं.वि. कलम ३५४, ४५२, ३२३, ५०४ सहकलम ३४ प्रमाणेच्या गुन्ह्याकरिता न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** मी आरोपींविरुध्द निशाणी क्र. २३ वर भारतीय दंड विधान कलम ३५४, ४५२, ३२३, ५०४ सहकलम ३४ या दंडनिय अपराधाकरिता दोषारोप निश्चित केले. सदर

दोषारोपातील मजकूर आरोपीस वाचून दाखविला व समजून सांगितला. आरोपीने त्याची जबानी नि.क्र. २४ ते ३६ नुसार दोषारोप नाकबूल करुन संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. अभियोग पक्षाच्या पुराव्यात आरोपींविरुध्द सकृत दर्शनी कुठलाही पुरावा न आल्याकारणाने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) नुसार बयाण नोंदविण्यात आले नाही.

**०५.** दोन्ही पक्षांचा युक्तीवाद, फिर्याद, दोषारोप आणि एकंदर पुराव्याअधारे खालील मुद्दे माझ्या विचाराधिन आहेत, त्यावरील माझे निष्कर्ष मी खालील प्रमाणे कारणमिमांसेसह देत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष.** |
|---|---|
| ०१. अभियोग पक्ष असे सिध्द करतो का की, दिनांक ०१.०६.२०२४ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता मौजे विडूळ ता. उमरखेड जि. यवतमाळ येथे फिर्यादीला लज्ञा वाटेल अशा उद्देशाने किंवा तसे होईल हे माहित असुनही तिच्यावर फौजदारी बलप्रयोग केला व त्यापरिणामी आरोपीने भारतीय दंड विधान कलम ३५४ सहकलम ३४ अन्वये शिक्षेसपात्र असलेला गुन्हा केला ? | ...सिध्द झाले नाही. |
| ०२. अभियोग पक्ष असे सिध्द करतो का की, वरील नमूद दिनांक, वेळी व स्थळी, फिर्यादीच्या घरामध्ये तुम्ही आरोपींनी तुमच्या समान उद्देशाच्या पुर:सरणार्थ, फिर्यादीस दुखापत करण्यची पुर्वतयारी करून तुम्ही आरोपींनी फिर्यादीचे गृह-अतिक्रमण केले व त्या परिणामी तुम्ही भारतीय दंड विधान कलम ४५२ सहकलम ३४ नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला ? | ...सिध्द झाले नाही. |
| ०३. अभियोग पक्ष असे सिध्द करतो का की, वरील नमूद दिनांक, वेळी व स्थळी, आरोपीने फिर्यादीची मुलगी हिला थापडबुक्यांने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहचविली आणि त्या परिणामी आरोपीने भारतीय दंड विधान कलम ३२३ सहकलम ३४ नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला ? | ...सिध्द झाले नाही. |
| ०४. अभियोग पक्ष असे सिध्द करतो का की, उपरोक्त नमूद, दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा अगर अन्य कोणताही अपराध घडावा या उद्देशाने ती शिवीगाळ करुन व अपमानीत करुन उद्युक्त केले त्या परिणामी आरोपीने भारतीय दंड विधान कलम ५०४ सहकलम ३४ नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला ? | ...सिध्द झाले नाही. |

| | |
|---|---|
| ०५. आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसाः

**०६.** आरोपींविरुध्द निर्धारित केलेला दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने असे शाबीत करायला हवे की, आरोपी यांनी, फिर्यादीची ओढणी ओढुन तिचा विनयभंग केला तसेच शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण केली व फिर्यादीच्या सासूचा कुर्ता ओढून, तिच्या पतीस घराबाहेर ओढून नेत जीवे मारण्याची धमकी दिली..

**०७.** मी अभियोग पक्षातर्फे श्री. व्ही.बी. गोरे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे श्री. व्ही.के.गाजेवार, विद्वान वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

### मुद्दा क्र.१ ते ४ करिताः

**०८.** मुद्दे क्र.१ ते ४ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे, पुराव्याची होणारी पुनरावृत्ती कमी करण्यासाठी व सोयीच्यादृष्टीने मी दोन्ही मुद्दे या ठिकाणी विचारार्थ एकत्रीत घेतले आहेत.

**०९.** आरोपींवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या अनुषंगाने अभियोग पक्षाने तपासलेला सा.क्र.१ फिर्यादी यांनी साक्षीत कथन केले की, घटना ही अंदाजे दिड वर्षापूर्वी विठ्ठूळ येथे तिच्या घरी घडली. घटनेच्यावेळी आरोपीत व तीच्या मध्ये क्षुल्लक कारणावरुन वादावादी झाली होती. याव्यतिरिक्त कांहीही घडलेले नाही. त्यानंतर फिर्यादीने आरोपींविरुध्द रागाच्या भरात पोलीस ठाणे, उमरखेड येथे फिर्याद दिली. सदर साक्षीदाराने फिर्यादवरील सही तीची असल्याचे मान्य केले, परंतु मजकूर तिला माहीत नसल्याचे त्याने कथन केले. सदर साक्षीदाराने घटनेच्या दिवशी व वेळी आरोपींनी तिला व तिच्या सासूला जिवे मारण्याची धमकी देउन तिचा विनयभंग केल्याची व शिवीगाळ केल्याची बाब स्पष्टपणे नाकारली आहे.

**१०.** सदर साक्षीदारास अभियोगपक्षातर्फे फितूर घोषित करुन उलट तपासातील स्वरुपाचे प्रश्न विचारले असता, त्यातही त्यांनी अभियोग पक्षाच्या समर्थनास दुजोरा देणारे

कुठलेही भाष्य केले नाही. तथापि, सरकारी वकीलांनी घेतलेल्या उलट तपासामध्ये फिर्यादी व पिडीतेने आरोपीसोबत तीची नि.क्र. २४ प्रमाणे तडजोड झाली असल्याचे कबूल केले आहे.

**११.** एकंदरीत, अभियोग पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुत खटल्यातील मुख्य कणा म्हणजे फिर्यादी यांनी क्षुल्लक कारणावरुन तिच्यात व आरोपीत वादावादी झाल्याचे व त्यानंतर फिर्यादीने तक्रार दाखल केल्याचे साक्षीत सांगितले आहे. सदर साक्षीदाराने घटनेच्या दिवशी व वेळी आरोपीने तिला जिवे मारण्याची धमकी देउन तिची ओढणी व सासुचा कुर्ता ओढुन विनयभंग केलयाची व शिवीगाळ केल्याची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. फिर्यादीने स्वतःच दाखल केलेली फिर्याद पुष्टीवर्धक पुराव्याआधारे सिध्द केली नाही. उलटपक्षी, सरकारी वकीलांनी साक्षीदारांच्या घेतलेल्या उलट तपासामध्ये तीने तिची आरोपींसोबत न्यायालयाच्या बाहेर तडजोड झाल्याचे कथन केले आहे. त्यानुषंगाने फिर्यादीने नि.क्र. ३१ वर पुरसीस दाखल करुन आणखी साक्षीपुरावा देणे नसल्याचे म्हणणे मांडले.

**१२.** एकंदरीत, प्रस्तुत खटल्यातील फिर्यादी फितूर झाल्यामुळे महत्वाचा साक्षीपुरावा फिर्याद सिध्द होऊ शकली नाही. अभियोग पक्षाला पुरेशी संधी देऊनही त्यांनी पिडीता, इतर महत्वाचे साक्षीदार व तपासीक अंमलदार यांची साक्ष नोंदविली नाही. अभिलेखावर कोणताही पुष्टीवर्धक, ठोस व विश्वसनिय पुरावा उपलब्ध नसल्यामुळे अभियोग पक्ष आरोपींविरुध्द निर्धारित केलेला दोषारोप सिध्द करण्यास पुर्णपणे अपयशी ठरतो. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ४ चे निष्कर्ष सिध्द झाले नाही असे नोंदविते.

**<u>मुद्दा क्र. ५ करिताः</u>**

**१३.** वरील नमुद चर्चेअंती मी दिलेल्या मुद्दा क्र.१ ते ४ च्या सिध्द झाले नाही या निष्कर्षावरुन, अभियोग पक्ष आरोपींवर ठेवलेले दोषारोप शंकेच्या पलीकडे जाऊन सिध्द करण्यास पुर्णतः अपयशी ठरल्यामुळे, आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. म्हणून, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी ०१. रितेश महेंद्र तिवारी, ०२. रोहित सतीष शहाणे, ०३. मयुर गोविंद डोम सर्व रा. विडूळ ता. उमरखेड जि. यवतमाळ, यांची भारतीय दंड विधान कलम ३५४, ४५२, ३२३, ५०४ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत ठेवलेल्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ च्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येतात.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७-अ च्या पुर्ततेसाठी आरोपीने १५,०००/- रुपयाचे वैयक्तिक बंधपत्र देण्याचे निर्देश देण्यात येतात.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित व निर्गमित करण्यात आला.)

JAYKRANTI HANMANTRAO PANCHAL
Digitally signed by JAYKRANTI HANMANTRAO PANCHAL
Date: 2026.06.06 17:22:43 +0530

**दिनांकः ०६.०६.२०२६** **(जयक्रांती एच. पांचाळ)**

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,उमरखेड
ता. उमरखेड जि. यवतमाळ.